**मा.सदस्य सचिव,म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४/०६/२०१७ रोजी मंडळाच्या मुख्यालय येथे डोंबिवली अतिप्रदूषित क्षेत्रातील प्रदूषण निर्देशांक कमी करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या कृती आराखडा अंमलबजावणीबाबत झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत.**

---------------

मा.सदस्य सचिव,म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४/०६/२०१७ रोजी मंडळाच्या मुख्यालयात डोंबिवली या अतिप्रदूषित क्षेत्रातील प्रदूषण निर्देशांक कमी करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या कृती आराखडा अंमलबजावणीबाबत आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस उपस्थित असलेल्या अधिकारी व उद्योगांचे प्रतिनिधी तसेच शासकीय अधिकारी यांची यादी सोबत जोडली आहे.

सह संचालक (हप्रनि) यांनी आढावा बैठकीबाबत प्रस्तावित केले व मागील बैठकीमध्ये उपस्थित केलेल्या मुददयाबाबत संबंधित घटकांनी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत याबाबतचा आढावा सादर करण्याबाबत उप प्रादेशिक अधिकारी यांना सांगितले व तदनंतर निर्देशांक कमी करण्याच्या अनुषंगाने उपस्थित घटकांकडून काय उपायायोजना करणे अपेक्षित आहे याबाबत चर्चा करण्यात आली.

प्रादेशिक अधिकारी, कल्याण या कार्यालयाकडून डोंबिवली औदयोगिक वसाहतीतील उदयोगांची वेळोवेळी प्रदूषण नियंत्रण संयंत्रणेची पहाणी व तपासणी करण्यात येते. सन २०१६ – १७ या कालावधीत पहाणी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने ८९ उदयोगांना कारणे दाखवा नोटीस, २३ उदयोगांना प्रस्तावित आदेश तर ८६ उदयोगांना उत्पादन प्रक्रियेतून निर्माण होणारे सांडपाण सामुहिक सांडपाणी संयंत्रणेत न सोडण्याचे आदेश बजावण्यात आले आहेत. ५ उदयोगांना बंदचे आदेश पारीत केले. सन २०१७ – १८ या कालावधीत पहाणी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने २४ उदयोगांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेले आहेत. तसेच फेज २ मधील सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रास मप्रनि मंडळाने दिलेल्या संमतीपत्रातील मानके विहित मर्यादित न आढळल्याने बंदचे आदेश पारीत केले होते. सदरबाबत डोंबिवली सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र यांनी मा. हरित लवादाकडे केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने मा. हरित लवादाने सदर सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रास क्षमतेच्या २५ % सांडपाणी प्रक्रियेसाठी घेण्याबाबतचे आदेश दि. २४/०५/२०१७ रोजी पारित केले आहे.

डीबीइएसए डोंबिवली सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र फेज १ यांनी सन २०१५ – १६ मध्ये केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने सदरील सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातून प्रक्रियाकृत सांडपाणी हे १०० मि. ग्रॅ. प्रति लि. बीओडी साध्य करत असल्याचे आढळते. सदर सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्राला मप्रनि मंडळाने ३० मिली प्रति लि. बीओडी इतके मानांकन साध्य करण्याबाबत संमतीपत्र तसेच आदेश पारित केले आहे.

औदयोगिक वसाहतीमध्ये सांडपाणी वाहून नेणारी पाईपलाईन टाकणे, पाईपलाईनची दुरूस्ती, चेंबर दुरुस्ती, वसाहतीमधील मोकळया भुखंडावरती टाकण्यात येणारा घनकचरा, वसाहतीमधील नागरीवस्तीत निर्माण होणा-या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया, मोकळया भुखंडांना कुंपण इ. बाबत चर्चा करण्यात आली.

औदयागिक वसाहतीमध्ये आजुबाजुच्या परिसरातील गावामधून तसेच नागरीकांकडून नागरी घनकचरा हा औदयोगिक वसाहतीमध्ये अनाधिकृतपणे टाकला जातो. सदरचा घनकच-यास ब-याचवेळा आग लागणे. डोंबिवली परिसरातील घरगुती सांडपाणी हे एकत्रित करून पाईपने मोटागांव सांडपाणी प्रक्रिया केंद्रास जोडणे व ते केंद्र कार्यरत करणे, आधारवाडी क्षेपणभुमी बंदिस्त करणे, नविन बारवे, मांडा व उंबर्डे या ठिकाणी घनकचरा व्यवस्थापनाची उभारणी करणे याबाबत चर्चा करण्यात आली.

डोंबिवली औदयोगिक क्षेत्रामध्ये उदयोजकांना हरित इंधन म्हणून सीएनजी गॅसचा पुरवठा व त्यांची जोडणी याबाबत महानगर गॅस कंपनी यांनी फेज १ क्षेत्रात २८०० मी. तसेच फेज २ मध्ये २१०० मी. पाईपलाईन टाकण्याचे काम पुर्ण झाले आहे. तर ३ सीएनजी स्टेशन पैकी १ कार्यरत झालेले आहे व २ प्रगतीपथावर आहेत.

| अ.क्र. | करावयाची कामे | कालमर्यादा | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| १. | डोंबिवली औदयोगिक वसाहतीतील डोंबिवली सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र फेज २ मधून निघणारे प्रक्रियाकृत सांडपाणी हे पुढे डीबीइएसए सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र फेज १ च्या प्रक्रियाकृत सांडपाणी वाहून नेणा-या वाहिनीस जोडणे. | ३० दिवसांमध्ये सदरची पाईपलाईन कार्यरत करणे. | म.औ.वि.महामंडळ/ म.प्र.नि.मंडळ/ सी.ई.टी.पी. |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | डोंबिवली औदयोगिक वसाहतीतील (फेज १ व फेज २) रासायनिक उदयोगातून निर्माण होणारे सांडपाणी हे वेगळया पाईपलाईन मार्फत डोंबिवली सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रापर्यंत फेज २ जोडणे. | एकूण ४ कि.मी. पाईपलाईनचे काम झाले असून उर्वरीत काम हे जानेवारी २०१८ पुर्वी पुर्ण करणे अपेक्षित आहे. | म.औ.वि.महामंडळ |
| ३. | डोंबिवली सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र येथील संपचे सांडपाणी वाहून नेणा-या पंपांची उंची वाढवणे. | सदरचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे. | म.औ.वि.महामंडळ |
| ४. | औदयोगिक वसाहतीतील मोकळया भुखंडांना कुंपन घालणे. | सदरील काम लवकरात लवकर सुरू करुन, ६ महिन्यांत पूर्ण करावे व त्याचा अहवाल सादर करावा. | म.औ.वि.महामंडळ |
| ५. | औदयोगिक वसाहतीमधील नागरी वस्तीतून निघणा-या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणे. | याबाबत सल्लागार नेमला असून लवकरच कामाची सुरवात करण्यात येईल, असे सांगितले. त्याबाबतचा अहवाल दर ४ महिन्यांनी सादर करण्यात सांगितले. | म.औ.वि.महामंडळ |
| ६. | डोंबिवली सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र फेज २ येथील औदयोगिक सांडपाणी साठवणूक कूपमध्ये एरिऐशन यंत्रणा बसविणे. | सध्या अस्तित्वात असलेले एरिएटर कार्यरत करण्यात आले असून, त्याची देखभाल नियमितपणे करण्यात सांगितले. | म.औ.वि.महामंडळ |
| ७. | डोंबिवली सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र फेज २ येथील औदयोगिक सांडपाणी साठवणूक कूपमधील गाळ काढणे. | सदरचा गाळ ऑगस्ट २०१६ मध्ये काढण्यात आला असून यानंतर पुढे ही वेळोवेळी गाळ काढण्यात येईल, त्याबाबतचा अहवाल एका महिन्यात सादर करण्यात सांगितले. | म.औ.वि.महामंडळ |
| ८. | औदयोगिक वसाहतीमधील भुखंड झाडे लावण्याकरिता उदयोजकांना उपलब्ध करून देणे. | सदरचे भूखंड एका महिन्यात उपलब्ध करून दिले जातील. | म.औ.वि.महामंडळ |
| ९. | डीबीईएसए डोंबिवली सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रास फेज १ वाढीव क्षमतेसाठी जागा उपलब्ध करून देणे. | याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असे सांगितले. त्याबाबतचा अहवाल एका महिन्यात देण्यात सांगितले. | म.औ.वि.महामंडळ |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | डीबीईएसए सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातून निघाण-या प्रक्रियाकृत सांडपाण्याचा बीओडी ३० मि.ग्रॅ. प्रति लि. साध्य करणे. | डीबीईएसए सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातून निघाण-या प्रक्रियाकृत सांडपाण्याचा बीओडी ३० मि.ग्रॅ. प्रति लि. इतके मानांकन साध्य करण्याबाबत संमतीपत्रामध्ये नमूद केले आहे. संमतीपत्रात नमूद केल्याप्रमाणे प्रक्रियाकृत सांडपाण्याचा बीओडी मानांकन ३० मि.ग्र./लिटर करण्याकरिता आवश्यक ते बदल करुन ऑक्टोबर २०१७ पर्यंत ते साध्य करण्याचे निर्देश दिले आहेत. | सि.ई.टी.पी.फेज-१ व फेज-२ |
| ११ | डीबीईएसए सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र तसेच डीसीईटीपी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र यांच्या प्रक्रियाकृत सांडपाण्याची मानकांची सद्यस्थिती हे मंडळाच्या संकेतस्थळास जोडणे. | दि. २५/०७/२०१७ पर्यंत. | सि.ई.टी.पी.फेज-१ व फेज-२ |
| १२ | औदयोगिक वसाहतीतील उदयोगांचे प्रक्रियाकृत सांडपाण्याची मानकांची सद्यस्थिती हे मंडळाच्या संकेतस्थळास जोडणे. | दि. १५ /०७/२०१७ पर्यंत. | सि.ई.टी.पी.फेज-१ व फेज-२ |
| १३ | डीसीईटीपी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातून निर्माण होणा-या प्रक्रियाकृत सांडपाणी हे मंडळाने दिलेल्या संमतीपत्रातील मानके साध्य करण्यासाठी सुधारणा करणे. | डिसेंबर २०१७ पर्यंत | सि.ई.टी.पी.फेज-१ व फेज-२ |
| १४ | औदयोगिक वसाहतीमधील नागरी घनकचरा तात्काळ गोळा करणे व त्याची विल्हेवाट लावणे. | एक आठवडयात घनकचरा गोळा करण्यासाठी वाहनांची व्यवस्था करणे. | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका |
| १५ | डोंबिवली नागरी परिसरातील मोटागांव येथील सांडपाणी प्रक्रिया केंद्र तात्काळ कार्यरत करणे. | ३० सप्टेंबर २०१७ पर्यंत. | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | आधारवाडी क्षपणभुमी बंद करण्याबाबत. | सदरचे काम ६ महिन्यात पुर्ण करणे व त्याबाबतचा कालबदध आराखडा एक आठवडयात सादर करणे. | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका |
| १७ | बारवे, मांडा व उंबर्डे येथे घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया व विल्हेवाट केंद्र कार्यरत करणे. | जानेवारी २०१८ पर्यंत. | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका |
| १८ | बारवे, आधारवाडी व चिंचपाडा येथील नागरी वसाहतीतील घरगुती सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा जोडणे व प्रक्रिया संयंत्रणा पुर्ण क्षमेतनुसार चालविणे. | डिसेंबर २०१७ पर्यंत. | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका |
| १९ | हरित इंधन पुरवठयासाठी सीएनजी पंपांची व्यापकता वाढविणे. | फेज २ मध्ये एक पंप कार्यरत आहे तसेच फेज १ मध्ये नविन पंप २ महिन्यात सुरू करणे प्रस्तावित असून, ६ महिन्यांत कार्यान्वित करण्याचे निर्देश देण्यात आले. | महानगर गॅस लिमिटेड |
| २० | आतापर्यंत एकूण किती उदयोगापर्यंत गॅस पाईपलाईन टाकण्यात आलेली आहे व किती उदयोगांनी सदर इंधन वापरण्याबाबत सहमती दर्शवली आहे. | याबाबतची माहिती १५ दिवसांत कळविणे. | महानगर गॅस लिमिटेड |
| २१ | उदयोजक, महानगर गॅस प्रादेशिक अधिकारी, कल्याण यांची गॅस पुरवठा, मुलभुत किंमत,कालावधी याबाबत एक संयुक्त बैठक सह संचालक (हप्रनि) यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात यावी. | १५ दिवस. | महानगर गॅस लिमिटेड |

मा. सदस्य सचिव यांनी महाराष्ट्र शासनाच्या झाडे लावा व झाडे जगवा या मोहिमे अंतर्गत प्रादेशिक कार्यालय, कल्याण यांनी ३ लाख झाडे लावणे अपेक्षित आहे. तरी सदरच्या उपक्रमास उदयोजकांनी औदयोगिक विभाग व इतर घटकांनी मोठया प्रमाणात सहकार्य करून हा उपक्रम यशस्वीपणे पार पाडावा असे आवाहन करून बैठक समाप्त झाल्याचे जाहिर केले.

**सह संचालक(हप्रनि)**
म.प्र.नि.मंडळ, मुंबई

**सदस्य सचिव**
म.प्र.नि.मंडळ, मुंबई